जिजाऊंच्या दोन कर्तृत्ववान सुनांचे करवंड येथे स्मारक व्हावे : ॲड. जयश्री शेळके >> पान 2

केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी दिली मुंबई मंत्रालयातील उपमुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्षेला सदिच्छा भेट >> पान 3

जलजीवन मिशन योजनेच्या पाण्याच्या प्रतीक्षेत आजही नागापूरकर >> पान 4


**सुविचार**

आभारी रहा, कारण आभाराने मन शांत होते.


दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 245 ■ शुक्रवार, दि. 18 एप्रिल 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




कंगणा २० वर्ष मोठ्या अभिनेत्यासोबत होती रिलेशनमध्ये; स्वत: केला मोठा खुलासा

आतील पान

# महाराष्ट्र त्रिभाषा धोरण लागू करणारे पहिले राज्य बनले

## आता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना मराठी-इंग्रजी व्यतिरिक्त हिंदीचाही अभ्यास करावा लागेल

दैनिक आपला विदर्भ




**मुंबई/प्रतिनिधी :राज्यात इयत्ता पहिलीपासून हिंदी शिकण्याच्या अनिवार्यतेवर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. ‘राज्य शालेय अभ्यासक्रम आराखडा २०२४’नुसार, मराठी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांतील पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना मराठी आणि इंग्रजीसह हिंदी ही तृतीय भाषा शिकवली जाईल. तर अन्य माध्यमांच्या शाळांमध्ये पहिली ते पाचवीसाठी माध्यम भाषा, मराठी आणि इंग्रजी अशा तीन भाषा असणार आहेत. जूनपासून सुरू होणाऱ्या शैक्षणिक वर्षापासून या धोरणाची अंमलबजावणी करण्यात येईल. हिंदी भाषेच्या सक्तीमुळे या शैक्षणिक धोरणाबाबत वादंग निर्माण होण्याची चिन्हे दिसत आहेत.**

सीबीएसई अभ्यासक्रमावर आधारित नव्या धोरणाची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने करण्यात येणार आहे. त्यानुसार यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता पहिलीपासून नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी होईल. तर पुढील वर्षी दुसरी, तिसरी, चौथी, सहावीसाठी नवे शिक्षण धोरण लागू करण्यात येईल. २०२८-२९ पर्यंत राज्यात बारावीपर्यंत सर्व इयत्तांसाठी नवे शिक्षण धोरण लागू होईल.

राष्ट्रीय शिक्षण धोरणाची राज्यात यंदापासून अंमलबजावणी होणार आहे. नव्या शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रमात भाषासंवर्धनाला विशेष महत्त्व देण्यात आले असून इयत्ता पहिली ते पाचवी मध्ये मराठी, इंग्रजी आणि हिंदी या तीन भाषा सक्तीच्या असतील. तसेच नव्या शैक्षणिक धोरणानुसार यापुढे प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तराऐवजी पायाभूत स्तर, पूर्वतयारी स्तर, पूर्वमाध्यमिक स्तर आणि माध्यमिक हे शब्द वापरले जातील.

पारंपरिक पद्धतीऐवजी ५-३-३-४ रचना

नव्या शैक्षणिक धोरणानुसार वय ३ ते ८ वर्षापर्यंत बालवाटिका म्हणजे १,२,३ तसेच इयत्ता पहिली आणि दुसरीचा पायाभूत स्तरामध्ये समावेश असेल. त्यानंतर वय ८ ते ११ म्हणजे इयत्ता तिसरी, चौथी आणि पाचवी यांचा पूर्वतयारी स्तरामध्ये समावेश असेल. तर वय ११ ते १४ वयोगट म्हणजे इयत्ता सहावी, सातवी आणि आठवी यांचा पूर्व माध्यमिक स्तरात समावेश असेल. तर माध्यमिक स्तरामध्ये १४ ते १८ वयोगट म्हणजे नववी ते बारावी इयत्तेचा समावेश असेल. नव्या धोरणानुसार १०+२+३ या पारंपरिक धोरणाऐवजी आता ५+३+३+४ अशा शैक्षणिक आकृतीबंध असेल.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा हिंदीच्या सक्तीला पाठिंबा



**मुंबई/प्रतिनिधी :**राज्यात यंदाच्या वर्षापासून लागू करण्यात येत असलेले शैक्षणिक धोरण हे नवे नाही. ते यापूर्वीच निश्रि्चत झाले होते. यासंदर्भात कोणताही नवा शासन आदेश लागू झालेला नाही. शैक्षणिक धोरणानुसार शाळांमध्ये करण्यात आलेली हिंदी भाषेची सक्तीचा निर्णय हा व्यापक दृष्टीकोनातून घेतला असावा, असे मत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडले. ते गुरुवारी मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी त्यांनी नव्या शैक्षणिक धोरणाबाबत सविस्तरपणे भूमिका मांडली.

राज्यात प्रत्येकाला मराठी आली पाहिजे, हा आमचा आग्रह आहे. त्यासोबत देशाची भाषाही बोलता आली पाहिजे. केंद्र सरकारने जो विचार केला, देशात एक संपर्क भाषा असली पाहिजे, त्यादृष्टीने शैक्षणिक धोरणात हिंदी भाषा सक्तीची करण्याचा निर्णय झाला. महाराष्ट्रात मराठी ही अनिवार्य असेल. मात्र, बाकीच्या भाषाही शिकू शकतात.देशात संपर्कसूत्र हिंदी भाषा आहे, त्यामुळे हिंदी लोकांनी शिकली पाहिजे. कोणाला इंग्रजी आणि अन्य भाषा शिकायची असेल तर मनाई नाही. हिंदी भाषा ही देशातील संपर्कसूत्र आहे, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

## फोडा आणि राज्य करा हा ब्रिटिशांचा मंत्र वापरला जातोय, हिंदी लादणाऱ्यांना राज ठाकरेंचा गर्भित इशारा



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महायुती सरकारने राष्ट्रीय शिक्षण धोरण अंमलबजावणी करण्यासाठी योजना केली आहे. जी २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून टप्प्याटप्प्याने लागू केली जाईल. यामध्ये मराठी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये पहिली ते पाचवीपर्यंत हिंदी ही सक्तीची तृतीय भाषा म्हणून शिकवली जाईल. या योजनेला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी कडाडून महायुती सरकारला गर्भित इशारा दिला आहे. विशेष दक्षिणेकडील राज्यांमध्येही हिंदी लादण्याला कडाडून विरोध होत आहे. तमिळनाडू सरकारने थेट मोदी सरकारविरुद्ध एल्गार करताना राष्ट्रीय शिक्षण धोरणाला विरोध केला आहे. राज ठाकरे यांनीही हिंदीच्या सक्तीला विरोध करताना आवाहनाला आव्हान देणार असाल, तर संघर्ष अटळ असल्याचा गर्भित इशारा दिला आहे.

दुसरीकडे, नवीन शिक्षण धोरणांतर्गत, महाराष्ट्र राज्य मंडळातही अभ्यासक्रम बदलण्यात आला आहे. ही पुस्तके आता एनसीईआरटीने तयार केलेल्या अभ्यासक्रमावर आधारित असतील. स्थानिक भाषा आणि भूगोलानुसार सामाजिक शास्त्रांमध्ये बदल केले जातील. महाराष्ट्रात मराठीची गळचेपी होत असताना आता हिंदीची घुसखोरी सुरु झाली आहे.

राज यांनी म्हटलं आहे की, सरकारचं सध्या जे सर्वत्र 'हिंदीकरण' करण्याचे प्रयत्न सुरू आहेत, ते या राज्यात आम्ही यशस्वी होऊ देणार नाही. हिंदी ही काही राष्ट्रभाषा नाही. ती देशातील इतर भाषांसारखी एक राज्यभाषा आहे. ती महाराष्ट्रात का म्हणून पहिलीपासून शिकायची? तुमचं त्रिभाषेचं सूत्र जे काही आहे, ते सरकारी व्यवहारांपुरतंच मर्यादित ठेवा, त्याला शिक्षणापर्यंत आणू नका. या देशात भाषावार प्रांतरचना झाली, आणि ती इतकी वर्ष टिकली. पण आत्ताच ही दुसऱ्या प्रांताची भाषा इथे महाराष्ट्रावर लादण्याचे प्रकार का सुरु झालेत? भाषावार प्रांतरचनेच्या तत्वालाच हरताळ फासला जात आहे.

## नागरिकांचे वाढले टेन्शन आता

# केस गळती नंतर नख गळतीने नागरिक त्रस्त

**बुलढाणा /जिमाका** :कोरोना व्हायरसने नागरिकांचे नव्हे तर, प्रशासनाची सुद्धा झोप उडवली होती. त्यानंतर जिल्ह्यातील खामगाव, शेगाव,नांदुरा, या तीन तालुक्यात टक्कल व्हायरसने दहशत निर्माण केली. केसगळती कोणत्या कारणास्तव झाली हे निष्पन्न झाले नसताना त्याच परिसरात नव्या व्हायरसने नागरिकांचे टेन्शन वाढविले आहे. शेगाव तालुक्यातील बोंडगाव येथील भागात नागरिकांचे आता नख गळतीचे प्रकार समोर येत असल्याने नागरिक भांबावून गेले आहेत. बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव खामगाव नांदुरा या भागात चार ते पाच महिन्यापूर्वी नागरिकांचे डोक्याचे केस गळून टक्कल पडले जात होते. सदर प्रकार हा कोणत्या कारणाने होत होता याबाबत नागरिक चिंतेत असताना या प्रकाराने एकच खळबळ उडाली होती. आरोग्य यंत्रणा कामाला लागली एवढेच नव्हे तर, टक्कल व्हायरसच्या उपायोजना करण्याकरिता थेट केंद्राने हस्तक्षेप केल्यानंतर आयसीएमआरची ॲलोपॅथिक होमिओपॅथिक आणि आयुर्वेदिक टीम या भागात येऊन नमुने घेऊन गेली आहे. सदर नमुन्याचा अहवाल अद्याप प्राप्त झाला नाही. त्यामुळे टक्कल व्हायरस चे कारण गुलदस्त्यात असताना आता नव्या व्हायरसने नागरिकांचे टेन्शन वाढविले आहे. नख गळती होत असल्याने नागरिकही भांबावून गेले आहेत.



### आरोग्य विभागाने तातडीने उपाययोजना करावी

जिल्हा आरोग्य विभाग आणि स्थानिक प्रशासन पुन्हा सक्रिय झाले असले तरी ठोस उपाययोजना अद्याप करण्यात आल्या नाहीत. नख गळतीची गंभीर समस्या लक्षात घेता या भागात विशेष वैद्यकीय शिबिरे, पाणी तपासणी आणि सार्वजनिक जनजागृती मोहिमा त्वरित राबवाव्यात. अचानक होणाऱ्या या आरोग्यविषयक समस्यांनी नागरिक आयसीएमआरचा अहवाल जाहीर व्हावा आणि त्यानुसार आरोग्य विभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## नाशिक हिंसाचार प्रकरणी १५०० जणांवर गुन्हा दाखल, राजकीय नेत्यांचाही संशयित आरोपीचा ठपका

**नाशिक/प्रतिनिधी :** मंगळवारी रात्री उशिरा नाशिकच्या काठे गल्ली परिसरात हिंसाचार उफाळून आला. अनधिकृत धार्मिक स्थळावरील कारवाईवरून नाशिकमध्ये हिंसाचार घडला. मध्यरात्रीच्या सुमारास जमावाने परिसरात जाळपोळ आणि दगडफेक केली. या घटनेत काही पोलीस अधिकारी देखील जखमी झाले होते. त्यानंतर पोलिसांनी काहींना अटक केली. या हिंसाचार प्रकरणी पोलिसांनी १४००-१५०० जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. तर, काही राजकीय नेत्यांवर संशियत आरोपींचा ठपका लावण्यात आला आहे. नाशिकच्या काठेगल्ली हिंसाचार प्रकरणी १४०० ते १५०० जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला. आतापर्यंत ५७ संशयित आरोपी निष्पन्न तर २५ जणांना नाशिक पोलिसांनी अटक केली. संशयित आरोपींमध्ये एका अल्पवयीन मुलाचाही समावेश आहे. दर्गा अतिक्रमण कारवाई दरम्यान नाशिक पोलिसांवर जमावाने हल्ला केला होता. या हल्ल्यात २१ पोलीस अधिकारी, कर्मचारी जखमी झाले. तर २५ ते ३० वाहनांची तोडफोड करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

# जिल्हा परिषद शाळांमध्ये स्वच्छतागृहाचा अभाव

## शासन दरबारी संबंधित अधिकारांची दिशाभूल करणारी माहिती सादर

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर : शाळांमध्ये स्वच्छता राहावी, विद्यार्थ्यांसाठी स्वच्छतागृह असावी, स्वच्छ पिण्याचे पाण्याची सुविधा असावी, यासह इतर पायाभूत सुविधा जिल्हा परिषद शाळांमध्ये असावी, यासाठी शासनाने लाखो रुपये खर्च करून प्रत्येक शाळेत स्वच्छतागृह उभारली आहेत. त्याचबरोबर पिण्याच्या पाण्यासाठी सुविधा केली आहे. मात्र, तालुक्यातील १६२ शाळां पैकी बहुतांश शाळांमध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये स्वच्छतागृहांचा अभाव आहे. असे असले तरी शासन दरबारी केवळ चार ठिकाणी स्वच्छतागृहांचा अभाव असल्याची माहिती आहे.**

मेहकर तालुक्यामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा १५० आहेत. तर, नगर परिषदेच्या ११ शाळा आहेत. त्याचबरोबर शासकीय आश्रम शाळा एक अशा एकूण तालुक्यात १६२ शाळा आहेत. या शाळांमधून देशाचे उज्वल भविष्य घडविणारे चिमुकले घडविले जात आहेत. विद्यार्थ्यांना ज्ञानार्जन करून त्यांना देशाचे भविष्य असणारे नागरिक घडविले जात आहेत. विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळावे सुसंस्कृत विद्यार्थी घडावी या हेतूने शासनाने प्रत्येक शाळेवर लाखो रुपयाची निधी खर्च करून भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्याच आले आहेत. विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच मैदानी खेळाचे धडे दिले जात आहेत. बौद्धिक व शारीरिक दृष्ट्या त्यांना एकदम तंदुरुस्त ठेवण्यासाठी शासन पुरेपूर प्रयत्न करीत आहेत. शिक्षणाबरोबरच शाळेत पिण्याच्या पाण्याची सुविधा असावी स्वच्छतागृह असावी, यासाठी प्रत्येक शाळेत लाखो रुपये खर्च करून स्वच्छतागृह उभारण्यात आली आहेत. मात्र, तालुक्यातील १६२ प्राथमिक शाळांपैकी केवळ चार ठिकाणीच स्वच्छतागृहाचा अभाव असल्याचा शेरा शासन दरबारी मारण्यात आला आहे. त्याचबरोबर दैनिक आपल्या विदर्भ टीमच्या टीमने काही ठिकाणी भेटी देऊन स्वच्छतागृहाची प्रत्यक्ष पाहणी केली असता, स्वच्छतागृह नादुरुस्त असल्याचे दिसून आले आहे. त्याचबरोबर अनेक शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सुविधा नसल्याची चित्रही दिसून आले आहे. प्रत्येक विद्यार्थ्याच्या सोबत बॉटलमध्ये भरून पाणी आणल्याचे चित्र बघितले आहे. त्याचबरोबर काही विद्यार्थ्यांना शाळेमध्ये पाण्याची सुविधा आहे. का? याबाबत माहिती विचारली असता विद्यार्थ्यांनी शाळेमध्ये पिण्याच्या पाण्याची कोणतीही सुविधा नाही, आम्ही बॉटलमध्ये घरून पाणी आणतो आणि तहान भागवतो अशी माहिती दिली आहे. यावरून जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये स्वच्छतागृहाचा व पिण्याच्या पाण्याचा अभाव असल्याचे चित्र दिसून आले आहे. असे असताना मात्र, शासन दरबारी तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या १५० नगरपरिषदेच्या ११ व शासकीय आश्रम शाळा एक अशा एकूण १६२ शाळांमध्ये स्वच्छतागृह व पिण्याच्या पाण्याची सुविधा असल्याचा शेरा शासन दप्तरी मारला असल्याचे चित्र वार्षिक अहवालात दिसून आले आहे. याबाबत लोकप्रतिनिधी व वरिष्ठांनी गांभीर्याने दखल घेत कोण कोणाची दिशाभूल करतो याबाबत चौकशी करण्याची गरज निर्माण झाली आहे.



देविदास खनपटे
मुख्य संपादक

### या चार ठिकाणी स्वच्छतागृहाचा अभाव

तालुक्यातील लाव्हाळा येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा येथे ग्रामपंचायत निधीतून बांधण्यात आलेल्या स्वच्छतागृहाचा वापर करण्यात येतो. तर, कोयाळी सास्ते येथे जिल्हा परिषद माध्यमिक प्राथमिक शाळेत एक नादुरुस्त स्वच्छतागृह आहे. नागापूर जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळेत जागा उपलब्ध नसल्यामुळे एकाच शाळेतील स्वच्छतागृह वापरले जात आहे. मेहकर येथील नगरपरिषद प्राथमिक शाळा क्रमांक ३ ची इमारत ही भाडेतत्त्वावर असून त्या ठिकाणी स्वच्छतागृह बांधकामासाठी जागा उपलब्ध नसल्याची माहिती मिळाली आहे अशा चार ठिकाणीच केवळ स्वच्छतागृहाचा अभाव असल्याचा माहिती शिक्षण विभागाने दिली आहे. तूर्तास एवढेच सविस्तर पुढील भागात...




जिल्हा परिषद शाळेमध्ये स्वच्छतागृह..!

## सोशल मीडियावरही आयपीएलचा फिव्हर !

आयपीएल अर्थात इंडियन प्रीमियर लीगचे हे अठरावं वर्ष आहे. सलग अठरा वर्ष आपली लोकप्रियता टिकवून ठेवणारी आयपीएल ही जगातील एकमेव क्रिकेट लीग आहे. गेली अठरा वर्ष केवळ भारतातीलच नाही तर जगातील सर्वाधिक लोकप्रिय क्रिकेट लीग म्हणून आयपीएलकडे पाहिले जाते. जगभरातील अनेक दिग्गज खेळाडू या लीगमध्ये सहभागी होतात. मुळातच क्रिकेटला एका धर्माप्रमाणे स्थान असलेल्या भारतामध्ये आयपीएल सुरू असल्याने सहभागी संघाचे फॅन फॉलोअर्सची संख्या देखील खूप मोठी आहे. आपल्या आवडत्या संघाला सपोर्ट करण्यासाठी फॅन मैदानावर गर्दी करताना दिसतात. आयपीएलचा सामना कोणत्याही मैदानावर, कोणत्याही शहरांमध्ये असो क्रिकेट रसिकांच्या उदंड प्रतिसादामुळे मैदाने तुडुंब भरली असल्याचे चित्र आपण दरवर्षीच पाहतो मात्र यावर्षी मैदानासोबतच मैदानाबाहेरही आपल्या आवडत्या संघाला सपोर्ट करण्यासाठी चाहत्यांमध्ये स्पर्धा लागली आहे. आजचे युग सोशल मीडियाचे युग आहे. सोशल मीडियाचा वापर न करणारा क्रिकेट चाहता शोधूनही सापडणार नाही. आयपीएलमध्ये सहभागी असणाऱ्या सर्वच्या सर्व म्हणजे दहाच्या दहा संघाचे स्वतंत्र ट्विटर ( एक्स ) अकाउंटस आहेत. प्रत्येक संघाला ट्विटरवर ( एक्स ) फॉलो करणारे लाखो फॉलोअर्स आहेत. हे फॉलोअर्स ट्विटर वरून आपल्या आवडत्या संघाला सपोर्ट करत असतात. आयपीएलची मॅच चालू असताना ट्विट्स चा अक्षरशः पाऊस पडतो. सेकंदाला हजारो ट्विट्स येत असतात. जो तो आपल्या संघाला सपोर्ट करण्यासाठी ट्विट करत असतात. या सर्वांमध्ये मुंबई इंडियन्स आणि रॉयल बंगळुरू चॅलेंज या संघांचे फॅन फॉलोअर्स सर्वात जास्त आहेत. ट्विटर प्रमाणेच व्हाट्सएप, फेसबुक, इन्स्टाग्रामवर देखील चाहते आपल्या संघाला सपोर्ट करीत असतात. आपल्या आवडत्या संघाची मॅच असेल तर चाहते आपल्या संघाला सपोर्ट करण्यासाठी व्हाट्सएपवर स्टेटस ठेवतात. सध्या सोशल मीडियाचं चित्र पाहिलं तर मुंबई इंडियन्स, चेन्नई सुपर किंग व रॉयल चेलेंजर्स बंगळुरू या तीन संघांना सोशल मीडियावर चाहत्यांचा सर्वात जास्त सपोर्ट मिळताना दिसत आहे. खेळाडूंमध्ये सर्वात जास्त सपोर्ट रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाच्या विराट कोहली याला मिळत आहे. टी २० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त झाला तरी विराट कोहलीची लोकप्रियता तसूभरही कमी झाली नाही उलट वाढतच चालली आहे हे सोशल मीडियावरुन लक्षात येते. दूरचित्रवाणीवर तर प्रेक्षक सामने पाहतच असतात पण ज्यांना दूरचित्रवाणीवर सामना पाहणे शक्य होत नाही ते मोबाईलवर सामना पाहतात. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाचा सामना कोणत्याही संघासोबत असला तरी प्रेक्षक त्यांचा सामना आवर्जून पाहतात. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा सामना जिओ टीव्ही वर सर्वात जास्त पाहिला जातो. करोडो प्रेक्षक जिओ टीव्हीवर सामने पाहतात. प्रत्येक सामन्याला करोडो प्रेक्षक मिळतात हा एक विश्वविक्रमच आहे. फेसबुक, व्हाट्सएपवर मॅच कोण जिंकणार याबद्दल चाहत्यांमध्ये पैजा लागत आहे. मॅच संपल्यानंतर मॅचवर आधारित तसेच प्रतिस्पर्धी खेळाडूंच्या खिल्ली उडवणाऱ्या मजेशीर मिम्स बनवून व्हायरल केल्या जात आहे. हे मिम्स बोलके असतात. यातून करमणूक तर होतेच पण संघाची सद्यस्थिती काय आहे हे देखील समजते. गुजरात टायटन संघाचा मुख्य प्रशिक्षक आशिष नेहरा खेळाडूंना सतत काही ना काही सल्ले देत असतो. ड्रिंक्स ब्रेक मध्ये तर तो कर्णधार आणि खेळाडूंना सल्ला देत असतोच पण सामना चालू असतानाही तो खेळाडूंचे डोके खात असतो. वेडावाकडा चेहरा करून हातवारे करत तो खेळाडूंचे डोके खात असतो त्यामुळे त्याची खिल्ली उडवणारे अनेक मिम्स सोशल मीडियावर धुमाकूळ घालत आहेत. चेन्नई आणि मुंबई संघ सध्या पराभवाच्या गर्तेत सापडले आहेत. सलग पाच सामन्यात पराभव झाल्याने चेन्नई संघ नेटिझन्सच्या निशाण्यावर आला असून या संघाची सोशल मीडियावर चांगलीच खेचली जात आहे. तीच गत मुंबईची आहे. मुंबईचाही सलग चार सामन्यात पराभव झाला आहे. त्यामुळे या दोन्ही संघांना सोशल मीडियावर टार्गेट केले जात आहे. या दोन्ही संघाचे आधारस्तंभ असलेले धोनी आणि रोहित शर्मा हे देखील आपल्या लौकिकाला साजेशी कामगिरी करत नसल्याने त्यांची देखील सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात खिल्ली उडवली जात आहे. प्रतिस्पर्धी संघाची आणि संघातील खेळाडूंची मजेशीर मिम्स आणि बनवून आणि मेसेज करून खिल्ली उडवतानाच नेटकरी आपल्या आवडत्या संघाला मात्र भरघोस पाठिंबा देत आहेत. आपल्या आवडत्या संघाला भरघोस पाठिंबा देतानाच प्रतिस्पर्धी संघाची खिल्ली उडवून फॅन आयपीएलचा फिव्हर आणखी वाढवत आहे. एकूणच केवळ मैदानावरच नव्हे सोशल मीडियावर देखील आयपीएलचा फिव्हर वाढल्याचे दिसून येत आहे.

# जिजाऊंच्या दोन कर्तृत्ववान सुनांचे करवंड येथे स्मारक व्हावे : ॲड. जयश्री शेळके

दैनिक आपला विदर्भ

**चिखली/प्रतिनिधी :** तालुक्यातील करवंड या गावाला ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. छत्रपती घराण्याच्या दोन कर्तृत्ववान सुनांचे हे माहेर आहे. याठीकाणी त्यांचे स्मारक उभारण्यात यावे अशी मागणी शिवसेनेच्या प्रवक्ता (उध्दव बाळासाहेब ठाकरे) ॲड.जयश्री शेळके यांनी राज्याचे मुख्यमंत्री मा.देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे मा.जिल्हाधिकारी बुलडाणा यांच्यामार्फत निवेदनाद्वारे केली आहे.





बुलडाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यातील करवंड हे गाव आजही ५२ बुरुजी गाव म्हणून ओळखले जाते. या गावची अजून एक महत्वाची ओळख म्हणजे माँसाहेब जिजाऊ यांच्या सहाव्या सुनबाई आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पत्नी राणी गुणवंताबाई राजे भोसले आणि तंजावरचे राजे छत्रपती व्यंकोजी राजे यांच्या पत्नी राणी दिपाताई राजे यांचे माहेर म्हणजे करवंड ! या दोघीही येथील इंगळे परिवाराच्या कन्या होत्या.आजपर्यंत चिखली तालुक्यातील जिजाऊ माँसाहेबांच्या दोन कर्तृत्वान सुनांचे माहेर करवडं हे गाव प्रकाशझोतापासून दूरच होते.

करवंड गावामध्ये आधी ५२ बुरुज होते. परंतु सद्यस्थिति फक्त तीन ते चार बुरुज शिल्लक आहेत. काळाच्या ओघात गावातील तसेच परिसरातील लोकांनी बुरुजांच्या मातीचा उपयोग घर बांधकामासाठी केला आहे. त्यामुळे खूप मोठ्या प्रमाणात बुरुजांचे नुकसान झाले आहे. यापुर्वी कोणीही या ऐतिहासिक स्थळांची दखल न घेतल्याने पुरातत्व विभागही यापासून अनभिज्ञ होता. पुरातत्व विभागालाही याची कुठलीही माहिती नव्हती. ज्यामुळे बुरुजांची योग्य ती दुरुस्ती देखभाल आजवर केली गेलेली नाही. पर्यायाने कळत नकळत ऐतिहासिक ठेवाच नष्ट करण्यात आला आहे. परंतुयाविषयी ५२ बुरुजी करवंड वतनातील परिसरात नव्याने संशोधन केल्यास अनेक संदर्भ इतिहासात मिळू शकतात. स्वराज्याप्रति स्वामिनिष्ठ असलेल्या या इंगळे घराण्याचा इतिहास उलगडणे अधिक महत्वाचे आहे.



करवंड येथील इंगळे घराणे हे सुमारे ३०० वर्षांपूर्वी तंजावरला गेल्यामुळे त्यांचे करवंड येथील वतन दुर्लक्षित राहिले. आज करवंड येथील इंगळे घराण्याच्या छत्रपती शिवरायांवरील निष्ठेचा आणि भोसले घराण्याच्या सुनांचा वारसा सांगणारे गढि, बुरुज आणि तत्कालीन अवशेष हे संवर्धनाच्या प्रतीक्षेत आहेत. राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ साहेबांच्या या दोन्ही सुनांचा आणि घराण्याचा इतिहास प्रकाशात आला पाहिजे. त्यामुळे करवंड या गावचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेऊनशासनाने राणी गुणवंताबाई राजे भोसले आणि राणी दिपाताई या छत्रपती घराण्याच्या दोन सुनांचे स्मारक उभारावे. तसेच जिल्ह्याच्या वैभवात भर घालावी अशी मागणी शिवसेनेच्या प्रवक्ता (उध्दव बाळासाहेब ठाकरे) ॲड.जयश्री शेळके यांनी राज्याचे मुख्यमंत्री मा.देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे मा.जिल्हाधिकारी, बुलडाणा यांच्यामार्फत निवेदनाद्वारे केली आहे.

## ''दूध का दूध'', वक्फ कायद्यातील दोन कलमांना सर्वोच्च न्यायालयाच्या स्थगितीवर काँग्रेसची पहिली प्रतिक्रिया

दिल्ली : वक्फ सुधारणा कायद्यातील दोन कलमांच्या अंमलबजावणीला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाचे काँग्रेसने स्वागत केले आहे. 'सत्यमेव जयते' अशी पहिली प्रतिक्रिया काँग्रेसकडून आली आहे. काँग्रेसचे नेते व माजी आम दार नसीम खान यांनी काही वेळापूर्वी पत्रकार परिषद घेतली आणि ते म्हणाले, ''सर्वोच्च न्यायालयाने नुसती स्थगिती दिलेली नाही तर केंद्र सरकारकडे जबाब मागितला आहे. या कायद्यातील अनेक मुद्द्यांवर आक्षेप घेतला आहे.''



नसीम खान म्हणाले, ''आम्ही सुरुवातीपासूनच सांगतोय की हा नियमबाह्य कायदा आहे. देशाच्या लोकसभेत, राज्यसभेत वक्फ सुधारणा विधेयकाच्या नावाखाली, मुस्लीम समाजाच्या उत्थानाच्या नावाखाली, गरीब मुसलमानांना मदत करण्याच्या नावाखाली हा जो नियमबाह्य कायदा बनवला आहे, त्याचा आम्ही विरोध केला होता. संपूर्ण देश पातळीवर, लोकसभा-राज्यसभेपासून ते रस्त्यांवर उतरून आम्ही विरोध केला. त्यानंतर आता सर्वोच्च न्यायालयाने त्यातील काही कलमांवर स्थगिती दिली आहे.

नसीम खान नेमकं काय म्हणाले?

काँग्रेस नेते म्हणाले, ''या निर्णयासाठी आम्ही सर्वोच्च न्यायालयाचे आभार मानतो. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचं स्वागत करतो. दूध का दूध आणि पाणी का पाणी दाखवण्यास सर्वोच्च न्यायालयाने सुरुवात केली आहे. आम्हाला विश्वास आहे की येत्या काळात यावर पुढील सुनावणीवेळी न्यायालय जनतेच्या बाजूने निकाल देईल. सरकारने जबरदस्तीने नियमबाह्य कायदा मंजूर करून घेतला आहे. त्यांनी या कायद्यात ज्या नियमबाह्य तरतुदी केल्या आहेत त्या सर्वोच्च न्यायालय निश्चितपणे निरस्त करेल.''

काँग्रेसचे माजी आमदार नसीम खान म्हणाले, ''आज वक्फ बिलाबाबत सर्वोच्च न्यायालयाने जो निकाल दिला आहे त्याचं आम्ही स्वागत करतो. या निकालानंतर स्पष्ट झालंय की सर्वोच्च न्यायालयात न्याय मिळतो. या न्यायासाठीच, काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि सर्व खासदारांनी वेगवेगळ्या पक्षाच्या नेत्यांनी या कायद्याचा लोकसभेपासून, राज्यसभेपासून ते देशातील रस्त्यांवर सगळीकडे विरोध केला होता. हा बेकायदेशीर कायदा असल्याचं ठणकावून सांगितलं. न्यायालयाने केंद्र सरकारला काही प्रश्न विचारले आहेत. त्यावरून सरकारची धोरणं समजतायत. विरोधी पक्षांच्या म ागणीनुसार आता न्यायालयाने त्या कायद्यावर स्थगिती दिली आहे.

## कंगणा २० वर्ष मोठ्या अभिनेत्यासोबत होती रिलेशनमध्ये; स्वत: केला मोठा खुलासा

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलीवूडमध्ये अनेक अभिनेत्रींनी वयाने मोठ्या असलेल्या सेलिब्रिटींसोबत लग्न केले आहे, जसे हेमा मालिनी, सायरा बानो. मात्र, काही अभिनेत्रींना अशा नात्यात केवळ वेदनाच मिळाल्या. अभिनेत्री आणि खासदार कंगना रणौत ही त्यापैकीच एक असल्याचे म्हटले जाते, जिने वयाच्या १८ व्या वर्षी एका विवाहित अभिनेत्यासोबत नाते ठेवले होते.

आदित्य पांचोलीसोबत वादग्रस्त नातं

कंगना रणौतने एका मुलाखतीत स्वतः तिच्या आणि अभिनेता आदित्य पांचोलीयांच्यातील नात्यावर भाष्य केले होते. आदित्य हा कंगनापेक्षा २० वर्षांनी मोठा होता आणि विवाहित व वडीलही होता, हे माहीत असूनही कंगनाने त्याच्यासोबत प्रेमसंबंध ठेवले. सुरुवातीला ते लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहत होते आणि त्यांनी अनेक वर्षे एकमेकांना डेट केले.

काही काळानंतर त्यांच्या नात्यात कटुता आली. रिपोर्ट्सनुसार आणि कंगनाच्या आरोपांनुसार, आदित्य पांचोलीने तिला बेदम मारहाण केली, खोलीत डांबून ठेवले आणि तिच्यावर अत्याचारही केले. या अनुभवाने कंगनाला खूप त्रास सहन करावा लागला आणि अखेरीस हे नाते संपुष्टात आले.

संघर्षानंतरचे यश

या अनुभवानंतर कंगना रणौतने बॉलीवूडमध्ये आपले स्थान निर्माण केले. तिचे नाव नंतर इतर काही सेलिब्रिटींशी जोडले गेले, पण कोणतेही नाते लग्नापर्यंत पोहोचले नाही. चित्रपटसृष्टीची कोणतीही पार्श्वभूमी नसतानाही, कंगनाने आज एक यशस्वी अभिनेत्री म्हणून स्वतःला सिद्ध केले आहे.

## सोलापुरात भाजपचे दोन आमदार आमने-सामने ,कल्याणशेट्टींना शह देण्यासाठी सुभाषबापूंची फिल्डिंग, पवारांचा जुना मोहरा हेरला

**सोलापूर/प्रतिनिधी :** सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीवरुन चांगलच वातावरण गरम झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. या निवडणुकीत भाजप आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी काँग्रेसबरोबर हातमिळवणी केल्यानंतर भाजप आमदार सुभाष देशमुखांकडूनही राजकीय फिल्डिंग लावायला सुरुवात झाली आहे. पारंपारीक विरोधक असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष बळीराम साठे यांची सुभाष देशमुखांनी भेट घेतली आहे. त्यामुळं राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

# ..तर बिगर मुस्लीम न्यायाधीश वक्फवर सुनावणी कशी करणार?

## सीजेआय ने दिलेले उत्तर प्रत्येकाने वाचायला हवे

दैनिक आपला विदर्भ

नवी दिल्ली : वक्फ (संशोधन) कायदा २०२५ वरून सध्या देशभरात जोरदार चर्चा सुरू असताना सुप्रीम कोर्टात बुधवारी या कायद्याच्या सुनावणीवरुन घमासान झाल्याचं पाहायला मिळालं. सरन्यायाधीश (ण्व्ह) संजीव खन्ना यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर ही सुनावणी पार पडली. या वेळी सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांच्याशी झालेला परखड संवाद विशेष गाजला.

काय आहे वादग्रस्त वक्फ (संशोधन) कायदा?

या नव्या कायद्यानुसार वक्फ बोर्ड आणि केंद्रीय वक्फ परिषदेतील सदस्यांमध्ये गैर-मुस्लिमांना समाविष्ट करण्याची तरतूद आहे. अनेक याचिकाकर्त्यांनी याला आव्हान दिले असून, त्यांच्या मते वक्फ संस्था धार्मिक स्वरूपाच्या असल्याने इतर धर्मीयांचा समावेश धर्मस्वातंर्त्याच्या विरोधात आहे.

खन्ना यांचा सरळ प्रश्न: ''हिंदू ट्रस्टमध्ये मुस्लिमांना सामील कराल का?''

सरकारकडून युक्तिवाद करताना सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी कायद्याचं समर्थन केले. मात्र, ण्व्ह संजीव खन्ना यांनी त्यांना रोखठोक प्रश्न विचारला. हिंदू ट्रस्ट किंवा मंदिरांच्या संचालक मंडळांमध्ये तुम्ही मुस्लिमांना सामील कराल का? या प्रश्नामुळे कोर्टात क्षणभर शांतता पसरली. खंडपीठातील जस्टिस के. व्ही. विश्वनाथन यांनीही तिरुपती बालाजी मंदिराचा दाखला देत विचारले, ''अशा संस्थांमध्ये किती गैर-हिंदू सदस्य आहेत?''




ण्व्ह खन्ना यांनी त्यांना तात्काळ टोकले आणि म्हणाले, ''नाही, मिस्टर मेहता, असे नाही! जेव्हा आम्ही बेंचवर बसतो, तेव्हा आम्ही आमचा धर्म, आमची पार्श्वभूमी सगळे विसरतो. आमच्यासाठी दोन्ही बाजू समान असतात. पण जेव्हा धार्मिक बाबींची देखरेख करणाऱ्या परिषदेचा प्रश्न येतो, तेव्हा आम्ही प्रश्न विचारू शकतो.आम्ही न्यायासनावर असताना आमचा धर्म विसरतो. आमच्यासाठी दोन्ही बाजू समान आहेत. मात्र, जेव्हा एखादी धार्मिक संस्था किंवा सल्लागार परिषद असते, तेव्हा सदस्यांची पार्श्वभूमी विचारात घेणं अपरिहार्य ठरते.''

कायद्याच्या अंमलबजावणीवर कोर्टाची तात्पुरती मर्यादा

सुप्रीम कोर्टाने स्पष्ट केले आहे की पुढील सुनावणीपर्यंत वक्फ बोर्ड आणि वक्फ परिषदेत कोणत्याही नव्या नियुक्त्या होणार नाहीत. तसेच, नोंदणीकृत किंवा आधी घोषित वक्फ मालमत्तांमध्ये कोणताही बदल केला जाणार नाही, असे सरकारने कोर्टात स्पष्ट केले आहे.

केंद्र सरकारने संसदेत मंजूर केलेल्या वक्फ सुधारणा कायद्याविरोधात सुप्रीम कोर्टात याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. सुप्रीम कोर्टाने सलग दोन दिवस सुनावणी केल्यानंतर आज आपले निर्देश जारी केले आहेत. सुप्रीम कोर्टाने वक्फच्या नव्या कायद्याला अंतरीम स्थगिती दिली आहे. केंद्र सरकारने ७ दिवसात उत्तर देण्याचे आदेशही सुप्रीम कोर्टाने दिले आहेत. ही स्थगिती दोन मुद्यांवर असून केंद्र सरकारने हमी दिल्यानंतर सुप्रीम कोर्टाने तसे आदेश जारी केले आहेत.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी दिली मुंबई मंत्रालयातील उपमुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्षेला सदिच्छा भेट

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** शिवसेनेचे मुख्यनेते तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्यामार्फत चालविल्या जाणाऱ्या मुंबई मंत्रालयातील उपमुख्यमंत्री वैद्यकीय कक्षेला केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी सदिच्छा भेट दिली आहे.

राज्यातील जनतेला आरोग्यसेवा मिळावी या दृष्टिकोनातून शिवसेनेचे मुख्यनेते तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या माध्यमातून मुंबई मंत्रालय येथे






उपमुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्ष सुरू करण्यात आला आहे केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव हे मुंबई दौऱ्यावर असतांना १६ एप्रील रोजी त्यांनी मंत्रालयातील उपमुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्षेला सदिच्छा भेट दिली यावेळी उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष प्रमुख मंगेश चिवटे यांनी मदत कक्षेमार्फत होणाऱ्या रुग्णसेवेची आणि कांमाची माहिती दिली. मागील काळात मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून हजारो रुग्णांना त्यांनी मदत केली केंद्र सरकारच्या आरोग्य संदर्भात विविध योजना आहेत त्या योजनेचा लाभ ही या कक्षेच्या माध्यमातुन रुग्णापर्यंत पोहचविल्या जातील असा विश्वास केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केली. यावेळी प्रा.डॉ.सचिन जाधव,युवासेना सहसचिव महाराष्ट्र राज्य तथा जिल्हाप्रमुख श्री.ऋषी जाधव व प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

## आपचा आणखी एक नेता रडावर: दुर्गेश पाठक यांच्या घरावर सीबीआयची छापेमारी

नवी दिल्ली : दिल्लीचे माजी मुख्यमंत्री तथा आम आदमी पार्टीचे नेते अरविंद केजरीवाल यांच्यावर दिल्ली दारू घोटाळ्याचे आरोप करण्यात आले. त्यामुळे त्यांना दिल्लीचे मुख्यमंत्री पद सोडावं लागलं. त्यानंतर आता आम आदमी पार्टीचा आणखी एक नेता तपास यंत्रणांच्या रडारवर आला आहे. आम आदमी पार्टीचे नेते दुर्गेश पाठक यांच्या घरावर सीबीआयनं छापेमारी केली. त्यामुळे गुजरात निवडणुकीच्या तयारीत असलेल्या आम आदमी पार्टीला यामुळे मोठा धक्का बसला आहे. परकीय चलन हेराफेरी प्रकरणात त्यांच्या घरावर सीबीआयनं छापेमारी केल्याचा दावा पक्षातील नेत्यांनी केला.

आम आदमी पार्टी सध्या गुजरात निवडणुकीच्या तयारीत आहे. मात्र याचवेळी गुजरात सहप्रभारी दुर्गेश पाठक यांच्या घरावर सीबीआयनं छापा टाकला. परकीय चलन हेराफेरी प्रकरणात सीबीआय त्यांच्या घरी पोहोचली. खासदार संजय सिंह यांनी हा दावा केला त्यांच्याशिवाय आम आदमी पार्टीच्या नेत्यांनी यावर संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. याबाबत आम आदमी पार्टीच्या नेत्या अतिशी यांनी सोशल माध्यमावर, ''आम आदमी पार्टीनं गुजरात निवडणुकीची तयारी सुरू करताच सीबीआयनं गुजरातचे सह-प्रभारी दुर्गेश पाठक यांच्या घरी छापा टाकला. गुजरातमध्ये फक्त 'आप'च भाजपाला आव्हान देऊ शकते. त्यामुळे आज मारलेल्या छापेमारीतून त्यांची निराशा दिसून येते. आपण त्यांच्या धमक्यांना घाबरणार नाही, हे भाजपाला समजलं नाही.''

आम आदमी पक्षाचे नेते मनीष सिसोदिया यांनीही या प्रकरणी संतप्त प्रतिक्रिया दिली. ''गुजरात निवडणूक २०२७ ची जबाबदारी मिळताच दुर्गेश पाठक यांच्या घरी सीबीआयचा छापा पडणं हा योगायोग नाही. भाजपाच्या भीतीतून निर्माण झालेलं हे षड्यंत्र आहे. आता फक्त आम आदमी पार्टीच त्यांना गुजरातमध्ये आव्हान देऊ शकतो, हे भाजपाला माहीत आहे. त्यामुळे भाजपा नेते हादरुन गेले आहेत.'' खासदार संजय सिंह यांनी, भाजपाचा घाणेरडा खेळ पुन्हा सुरू झाला आहे. गुजरातचे सह-प्रभारी दुर्गेश पाठक यांच्या घरी सीबीआय पोहोचली आहे. मोदी सरकारनं आम आदमी पार्टीला नष्ट करण्यासाठी सर्व युक्त्या वापरून पाहिल्या आहेत. गुजरातमध्ये भाजपाची अवस्था वाईट आहे. दुर्गेश पाठक यांना गुजरातचे सह-प्रभारी बनवताच, त्यांना धमकी देण्यासाठी सीबीआय पाठवण्यात आली.''

## सुप्रीम कोर्टाच्या राष्ट्रपतींना विधेयकांवर निर्णय घेण्यासाठी वेळ ठरवण्याच्या निर्णयावर उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचा आक्षेप

नवी दिल्ली : राष्ट्रपतींना विधेयकांवर निर्णय घेण्यासाठी कालमर्यादा निश्चित करणाऱ्या सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या अलीकडील निर्णयावर उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी चिंता व्यक्त केलीय. ते यावर म्हणाले की, भारतात काही अशी लोकशाही नाही की, जिथे न्यायाधीश कायदे करतील, कार्यकारी कार्ये करतील आणि ''सुपर पार्लमेंट'' म्हणून काम करतील.



गेल्या आठवड्यात, सर्वोच्च न्यायालयाने पहिल्यांदाच असे आदेश दिले होते की राष्ट्रपतींनी, राज्यपालांनी विचारार्थ राखून ठेवलेल्या विधेयकांवर असा संदर्भ मिळाल्यापासून तीन महिन्यांच्या आत निर्णय घ्यावा. ''अलिकडच्या निकालाने राष्ट्रपतींना निर्देश दिले आहेत. यावर, आपण कुठे जात आहोत? देशात काय चालले आहे? आपल्याला अत्यंत संवेदनशील राहावे लागेल. कोणीतरी पुनरावलोकन याचिका दाखल करावी की नाही हा प्रश्न नाही. पण, आपण हे ऐकण्यासाठी लोकशाही आणली नाही. राष्ट्रपतींना कालमर्यादेत निर्णय घेण्याचे आवाहन केले जाते आणि जर तसे झाले नाही तर ते कायदा बनते, हे काय बोलणे झाले'' असे धनखड म्हणाले.

राज्यसभेतील इंटर्न्सच्या गटाला संबोधित करताना ते म्हणाले, ''आपल्याकडे असे न्यायाधीश आहेत जे कायदे करतील, कार्यकारी कार्ये करतील, जे सुपर पार्लमेंट म्हणून काम करतील आणि त्यांना कोणतीही जबाबदारी नाही कारण त्यांना देशाचा कायदा लागू होत नाही''. धनखड म्हणाले की त्यांना या गोष्टीची चिंता आहे की, त्यांनी ''माझ्या आयुष्यात'' कधीही विचार केला नव्हता की त्यांना ही गोष्ट पाहण्याची आणि ऐकण्याची वेळ येईल.

त्यांनी यावेळी एक गोष्ट नमूद केली की, भारताचे राष्ट्रपती हे एक अतिशय उच्च पद आहे. राष्ट्रपती संविधानाचे जतन, संरक्षण आणि रक्षण करण्यासाठी शपथ घेतात. मंत्री, उपराष्ट्रपती, संसद सदस्य आणि न्यायाधीशांसह इतर लोक संविधानाचे पालन करण्याची शपथ घेतात. ''आपल्याकडे अशी परिस्थिती असू शकत नाही जिथे तुम्ही भारताच्या राष्ट्रपतींना निर्देश देता आणि ते कोणत्या आधारावर? संविधानानुसार तुम्हाला फक्त कलम १४५(३) अंतर्गत संविधानाचा अर्थ लावण्याचा अधिकार आहे. तेथे पाच न्यायाधीश किंवा त्याहून अधिक न्यायाधीश असणे आवश्यक आहे, असेही ते म्हणाले.

## मॉडेल डिग्री कॉलेजमधील दोन विद्यार्थिनींना मिळाली रोजगार मेळाव्यातून नोकरीची संधी



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** विद्यार्थीदशेत शालेय शिक्षण घेत असतानाच मॉडेल डिग्री कॉलेजमधील दोन विद्यार्थिनींना रोजगार मेळाव्यातून नोकरीची संधी मिळाली आहे या दोन्ही विद्यार्थिनींचे अभिनंदन करण्यात आले

बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथील संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयात रोजगार मेळाव्याचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते बुलडाणा येथील मॉडेल डिग्री कॉलेजमध्ये शिकणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना प्रोत्साहित रोजगार मेळाव्यात जाण्या संदर्भात कॉलेजच्या प्राध्यपकांनी मार्गदर्शन केले होते या रोजगार मेळाव्यामध्ये वाणिज्य शाखेत शिकणाऱ्या कु वैष्णवी पवार व प्रियंका वैष्णव या दोन विद्यार्थिनींना टाटा कन्सल्टन्सीमध्ये नोकरीची संधी मिळाली आहे या संदर्भातील नियुक्तीपत्र त्यांना नुकतेच मिळाले आहे या दोन्ही विद्यार्थिनीचं मॉडेल डिग्री कॉलेजचे मानद संचालक अण्णासाहेब म्हळसणे यांनी अभिनंदन केलं यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते

## त्र्यंबकेश्वरला व्हीआयपी दर्शनाच्या पासचा काळाबाजार, ६०० रुपयांचे पास २ हजाराला विकले, भक्तांची लूट

सुरत : त्र्यंबकेश्वर मंदिरात दर्शनासाठी जास्त पैसे घेऊन खोटे तिकीट विकल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याबाबत मंदिर ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमित माचवे यांनी त्र्यंबकेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे.

गुजरात राज्यातील सुरत येथील भाविकासोबत हा प्रकार घडला असून, थेट दर्शनासाठी असलेल्या २०० रुपयांची तीन व्हीआयपी तिकिटे मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ भेटलेल्या एका व्यक्तीने २ हजार रुपयांना विकली. मात्र, ही तिकिटे मंदिराच्या प्रवेशद्वारी असलेल्या संगणकीय स्कॅनिंग यंत्राने स्वीकारली नाहीत व त्यामुळे फसवणुकीचा प्रकार उघडकीस आला.

# तलाव मासेमारी ठेक्यासाठी निविदा आमंत्रित

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/जिमाका :** शासनाने सुधारीत तलाव, जलाशय धोरण जाहिर केलेले आहे. त्यानुसार सन २०२५-२६ वर्षाकरिता, बुलढाणा जिल्ह्यातील ५०० हेक्टर खालील कोराडी ३६७ हेक्टर तलावाच्या निर्धारित कार्यक्षेत्रातील मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना शासन निर्णय, अटी व शर्तीचे अधिन जिल्हास्तरीय तलाव ठेका समितीचे मान्यतेने तलाव मासेमारी ठेक्याने देण्यात येणार आहे.

अटी-शर्ती : संस्थेचा विहीत नमुन्यातील मागणी अर्ज (तलाव ठेका नमुना-१), तलाव ठेका मागणीबाबतचा संस्थेचा ठराव व अर्ज, सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तां), बुलढाणा यांचे संस्था नोंदणी नाहरकत प्रमाणपत्र/उपविधी नाहरकरत प्रमाणपत्र तसेच संस्था नोंदणी प्रमाणपत्र व उपविधी पृष्ठाची सत्यप्रत व ९७ वी घटना दुरुस्तीची प्रत, सहाय्यक निबंधक (दुग्ध), बुलढाणा यांचे संस्था कार्यरत असल्याचे प्रमाणपत्र, सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तां), बुलढाणा यांचे संस्था थकबाकीदार नसल्याचे प्रमाणपत्र, संचालक मंडळाची यादी, लेखापरिक्षण अहवाल (मागील तीन वर्षाचा सन २०२२-२३, सन २०२३-२४ व सन २०२४-२५), संस्थेचे मागील तीन वर्षाचे बॅक स्टेटमेन्ट, मागील तीन वर्षाचा नफा तोटा पत्रक, प्रतिवर्ष मत्स्यबीज संचयन व मत्स्योत्पादन अहवाल.(मागील ५ वर्षे तलाव ठेका कालावधीचा), संस्थेची इतर



माहिती दर्शविणारा अहवाल (जसे किसान क्रेडीट कार्ड, अपघातगट विमा, ई-श्रम कार्ड, इत्यादी) १२) १०% मत्स्यबीज संचयनाचा अगाऊ रक्कमेचा धनादेश, एकाच कुटुंबातील एकापेक्षा जास्त सभासद नसल्याचे प्रमाणपत्र, हमीपत्र या अटी-शर्तीची पुर्तता तलाव, जलाशयावर नोंदणीकृत मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना करणे बंधनकारक आहे.

शासन निर्णय कृषी व पदुम विभाग दि. ३ जुलै २०१९ मधील तरतूदी व अटी शर्तीनुसार बुलढाणा जिल्ह्यातील पाटबंधारे विभागाचे तलाव ठेका मुदत संपुष्टात आलेले तलाव नव्याने मासेमारी ठेक्याने देण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या आहेत. याबाबत सविस्तर तपशील शासनाच्या www.maharashtra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तसेच सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तांत्रिक), बुलढाणा कार्यालयाचे नोटीस बोर्डवर उपलब्ध आहे, अशी माहिती सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तां), बुलढाणा कार्यालयामार्फत देण्यात आली आहे.

## संक्षिप्त...

### खामगाव शासकीय औद्योगिक संस्थेत सोमवारी शिकाऊ उमेदवारी भरती मेळावा

दैनिक आपला विदर्भ


**बुलढाणा/जिमाका :** राज्यातील उमेदवारांना विविध क्षेत्रात निर्माण होत असलेल्या रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रधानमंत्री राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी भरती मेळावाचे आयोजन करण्यात आले आहे. इच्छुक व पात्रताधारक उमेदवारांनी सतगुरु श्री. आगाशे काका शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था खामगाव येथे सोमवार दि. २१ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १० वाजता उपस्थित राहून संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्राचे प्रशिक्षणार्थी सल्लागार एस.डी. गंगावणे यांनी केले आहे.

इलेक्ट्रसियन, फिटर, फाउंड्रमन, मॅकनिस्ट, मॅकनिस्ट ग्रिंडर, मॅकेनिक डिझेल, मॅकनिक मॅकट्रानिक्स, मॅकनिक मोटर व्हकेल, मॅकनिक मशिन टूल मेंटन्स,पेंटर जनरल, शिट मेट वर्कर, टूल अँड अम्प डाई मेकर, ट्नर, वेल्डर, सिएनसी अँड अम्प व्हीएमसी ऑपरेटर ह्या व्यवसायातुन २०२१, २०२२, २०२३, २०२४ आयटीआय उत्तीर्ण असलेल्या व सध्या सुरु असलेल्या शैक्षणिक वर्षात प्रवेशित उमेदवारांनी भरती मेळाव्याचा लाभ घ्यावा.

### आर्चरी खेळाडू प्रथमेश जावकार शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराने सन्मानित

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/जिमाका :** जिल्ह्यातील आंतराष्ट्रीय आर्चरी खेळाडू प्रथमेश समाधान जावकार यांच्या कामगिरीची दखल घेवून महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागामार्फत सन २०२३-२४ चा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. पुरस्कार वितरण सोहळा दि. १८ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११ वाजता शिवछत्रपती क्रीडा क्रीडापीठ (बॅडमिंटन हॉल) म्हाळुंगे-बालेवाडी, पुणे येथे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या शुभहस्ते व मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व इतर सन्माननीय मान्यवर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे. पुरस्काराचे स्वरुप ३ लाख रुपये रोख, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र पुष्पगुच्छ प्रदान करुन मान्यवरांच्या शुभहस्ते प्रथमेश समाधान जावकर यांना सन्मानीत करण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी बी.बी. महानकर यांनी दिली.



### माजी आयपीएस के. अण्णामलाई मंत्री होणार ? केंद्रीय मंत्रिमंडळाचा विस्तार होणार ?

नवी दिल्ली : लवकरच केंद्रीय मंत्रिमंडळाचा विस्तार होण्याची शक्यता आहे. तसेच तामीळनाडू भाजपाचे माजी अध्यक्ष आणि माजी आयपीएस के. अण्णामलाई यांचा केंद्रीय मंत्रिमंडळात समावेश होण्याची शक्यता आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली. या भेटीनंतर भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या निवासस्थानी पक्षाच्या नेत्यांची उच्चस्तरिय बैठक झाली. गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, वाणिज्य मंत्री पियुष गोयल, रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव आणि इतर वरिष्ठ नेते चर्चेसाठी उपस्थित होते. ही बैठक बराच काळ चालली. या बैठकीत अनेक मुद्यांवर चर्चा झाली. देशासमोरचे प्रश्न, पक्षापुढील आव्हाने, कोणत्या समस्येला सोडवण्यासाठी कोणती व्यक्ती सक्षम आहे अशा अनेक मुद्यांवर चर्चा झाली. चर्चेची जास्त माहिती बाहेर आलेली नाही. पण एरवी बुधवारी होत असलेली मंत्रिमंडळाची बैठक अचानक रद्द झाली. यानंतर मंत्रिमंडळ विस्ताराच्या चर्चेने जोर धरला आहे.

तामीळनाडू आणि बिहार या दोन राज्यांशी संबंधित निवडक नेत्यांना केंद्रीय मंत्रिमंडळात स्थान मिळण्याची दाट शक्यता आहे. तसेच विशेष कामगिरी न केलेल्या काही मंत्र्यांचे राजीनामे घेतले जाण्याचीही शक्यता आहे. वर्षभरात तामीळनाडू आणि बिहार या दोन मोठ्या राज्यांमध्ये विधानसभेची निवडणूक आहे. मंत्रिमंडळाचा विस्तार करताना या मुद्याचा हमखास विचार होईल, असे राजकीय अभ्यासकांचे मत आहे.

### पत्नीने प्रियकराच्या मदतीने केला पतीचा खून; विषारी सापाला सोडले पलंगावर अन् मग झाले असे काही

लखनऊ : अनैतिक संबंधात अडसर ठरणाऱ्या पतीचा पत्नीने प्रियकराच्या मदतीने खून केल्याने मोठी खळबळ उडाली. ही घटना उत्तर प्रदेशातील मेरठ जिल्ह्यातील बहसुमा पोलीस ठाण्याच्या परिसरात घडली. विशेष म्हणजे पतीचा खून केल्यानंतर त्याच्या पलंगावर मारेकऱ्यांनी साप आणून सोडला. त्यामुळे सापाच्या चाव्याने पतीचा मृत्यू झाल्याचा बनाव पत्नीने केला. मात्र शवविच्छेदन अहवालात या तरुणाचा गळा आवळून खून केल्याचे उघड झाल्यानंतर या घटनेला वाचा फुटली.

पतीला अनैतिक संबंधाची भनक लागल्यानंतर पत्नीनं थंड डोक्यानं पतीला संपवल्याची धक्कादायक घटना मेरठमध्ये उघडकीस आली. त्यामुळे नागरिकांना सौरभ हत्याकांडाची आठवण झाली.



नागापूर येथील जल जीवन मिशन योजनेच्या अर्धवट असलेले पाण्याच्या टाकीचे बांधकाम..!



# जलजीवन मिशन योजनेच्या पाण्याच्या प्रतीक्षेत आजही नागापूरकर

## महिलांची पाण्यासाठी पायपीट कायम : रोहित्राचाही पाणीपुरवठा योजनेला खोडा

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी : गावातील पाणी समस्या निकाली निघावी यासाठी तब्बल एक कोटी २५ लाख ३४ हजार रुपये मंजूर करून शासनाच्या वतीने जलजीवन मिशन योजना राबविण्यात आली. मात्र सदर योजनेला संबंधित प्रशासनाच्या दुर्लक्षित धोरणामुळे नागापूर येथील माय माऊल्यांना पाण्यासाठी पायपीट करावी लागत आहे. त्यातच पाणीपुरवठा करणाऱ्या योजनेला विद्युत पुरवठा करणाऱ्या रोहित्र नसल्याने पाणीपुरवठा करण्यास मोठी समस्या निर्माण झाली आहे.**

नागापूर येथे जल जवान मिशन योजनेसाठी तब्बल एक कोटी २५ लाख ३४ हजार रुपयांचा निधी मंजूर करून सदर योजनेअंतर्गत करण्यात येणाऱ्या कामाला ९ मार्च २०२२ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला होता. सदर कामे १८ महिन्यात पूर्ण करणे अपेक्षित होते. असे असताना आता या कामाला तीन वर्षाच्यावर कालावधी होत असताना केवळ ७२. ८० टक्के काम झालेले आहे. तर, या कामावर ४३ लाख ८२ हजार रुपये खर्च झाले आहेत. सदर योजनेअंतर्गत विहीर खोदकाम, पंप, पंपिंग मशनरी, जलवाहिनी, पाण्याची टाकी, पाण्याची वितरण व्यवस्था आदी काम करण्याचे कंत्राटदार यांच्यामार्फत करण्यात प्रारंभ करण्यात आला होता. मात्र, तीन वर्षाचा कालावधी होत असतानाही अद्याप जल जीवन मिशनचे काम पूर्ण न झाल्याने महाजल योजनेप्रमाणेच जलजीवन मिशन योजनाही सपशेल फेल झाल्याचे चित्र नागापूर येथे दिसून येत आहे. परिणामी, नागापूर येथील मायमाऊल्यांना पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ आली आहे. उन्हाळ्यात च्या दिवसांमध्ये पाणीटंचाई भीषण पाणीटंचाई निर्माण झाली आहे हंडाभर पाण्यासाठी गावातील महिलांना रानोमाळ भटकंती करण्याची वेळ आली आहे सदर योजना पूर्ण झाली असती तर आज गावातील पाणी टंचाईची समस्या कायमची निकाली निघाली असती. मात्र, सदर योजना अधिकारी पदाधिकारी व ग्रामपंचायत प्रशासनाच्या निष्काळजी पणामुळे पूर्णत्वास गेली नाही. परिणामी गावात भीषण पाणीटंचाई निर्माण झाली आहे. त्यातच पाणीपुरवठा करणाऱ्या योजनेचे रोहित्र जळाल्याने पाणीपुरवठा करण्यासाठी खोडा निर्माण झाला आहे. पाणीपुरवठा करण्यासाठी नवीन रोहितची मागणी करण्यात आली आहे नवीन रोहित लावल्यानंतरही गावात पाणीपुरवठा होईल की नाही याबाबत मात्र शंका उपस्थित केली जात आहे. कारण जल जीवन मिशन योजनेचे काम हे मनमानी पद्धतीने अर्धवट स्थितीत झालेले आहे.त्यामुळे अर्ध्या गावाला पाणी तर, अर्ध्या गाव पाण्याविना राहणार असल्याचे चित्र सध्या तरी दिसून येत आहे.



महाजल नंतर जल जीवन मिशन योजनेचा बट्ट्याबोळ

नागापूर येथील प्रकार : महिलांच्या डोक्यावर हंडा कायम!; हर घर नल घर घर जल योजनेचा बोजवारा जल जीवन मिशन च्या पाण्याच्या गावकरी प्रतीक्षेत..

दैनिक आपला विदर्भ

जल जीवन मिशन योजनेच्या जल कुंभ चे टिपलेले जानेवारी २०२५ मधील छायाचित्रे..!

भाग २१

नागापूर येथील जलजीवन मिशन पाण्याच्या टाकीचे अर्धवट बांधकाम..!

देविदास खनपटे
मुख्य संपादक

पाणी टंचाई उग्ररूप धारण करण्याची शक्यता

पाणी समस्या निकाली न निघाल्यास तीव्र आंदोलन

## रोहित्र बसविण्याचा ग्रामपंचायतीने घेतला ठराव

२७ फेब्रुवारी रोजी नागापूर ग्रामपंचायतची मासिक सभा सरपंच सौ.कल्पना समाधान गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली ग्रा.प. कार्यालयात घेण्यात आली. या सभेत ग्रा. पं. सार्वजनिक विहिरीवरील पाणीपुरवठा नियमित होण्यासाठी विद्युत रोहित्र वीजपुरवठा सुरळीत करण्यात यावा, ग्रा. पं. सार्वजनिक विहिरीवरील पाणीपुरवठा नियमित होण्यासाठी नविन रोहित्र विज पुरवठा वीज वितरण कंपनीच्या कार्यालया कडून सुरळीत करुन घेण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. तसेच पाणीपुरवठा समस्या निकाली काढण्यासाठी चर्चा करण्यात आली. की गावठाण विद्युत रोहित्रावर काही शेतकऱ्यांनी कृषीपंपाचे कनेक्शन जोडल्याने गावातील विद्युत पुरवठा खंडित होत आहे. मात्र सदर सभेच्या ठरावाला दोन महिन्याच्या वर कालावधी झाला असला तरीही अद्यापही गावातील समस्या कायम असल्याने जल जीवन मिशन त्याचबरोबर ग्रामपंचायतच्या ठराव काय कामाचा असा प्रश्न नागरिक करीत आहेत.



# तृतीयपंथीय व्यक्तींना ओळखपत्र व प्रमाणपत्राचे वाटप

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/जिमाका :** समाजकल्याण कार्यालय येथे सामाजिक न्याय पर्व अंतर्गत तृतीयपंथीय व्यक्तीकरिता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्ह्यातील ३४ तृतीयपंथीयांना ओळखपत्र व प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले.

जिल्ह्यातील सर्व तृतीयपंथीय व्यक्तींची नोंदणी ऑनलाईन प्रणालीवर होणे आवश्यक आहे. त्यामुळे ज्या तृतीयपंथीयाची नोंदणी झाली नाही, त्यांनी ऑनलाईन प्रणालीवर नोंदणी करण्याचे आवाहन यावेळी केले. त्यानंतर उपस्थित तृतीयपंथीय यांच्या समस्या जाणुन त्यावर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच तृतीयपंथीय यांनी त्यांच्या निवासाकरिता जागा उपलब्ध व्हावी यासाठी उपाययोजना करण्याची मागणी केली. यावेळी प्रणिता बावणकर, विजया राऊत, रिता जाधव, किरण गवई आदी उपस्थित होते.



# पाणी टंचाई निवारणार्थ चिखली तालुक्यातील चार गावांसाठी टँकर मंजूर

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/जिमाका :** पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता चिखली तालुक्यातील चार गावांसाठी पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. यामध्ये धोडप, हिवरा नाईक, पळसखेड सपकाळ व किन्ही नाईक या ठिकाणी ठरवून दिल्याप्रमाणे टँकरव्दारे पाणी पुरवठा केल्या जाणार आहे, अशी माहिती चिखली उपविभागीय अधिकारी यांनी दिली.




चिखली तालुक्यातील धोडप गावात ९९८ पशुधन व २ हजार ७१० लोकसंख्येसाठी एक टँकरने ६३ हजार २०० लिटर्स पाणी पुरवठा, हिवरा नाईक येथे १ हजार पशुधन व ७९० लोकसंख्येसाठी एक टँकरने ३५ हजार ३०० लिटर्स पाणी पुरवठा, पळसखेड सपकाळ येथे ४९८ पशुधन व ५८० लोकसंख्येसाठी एक टँकरने २१ हजार ५६० लिटर्स पाणी पुरवठा तसेच किन्ही नाईक येथे ७०० पशुधन व २ हजार ४७० लोकसंख्येसाठी एक टँकर ६१ हजार ९०० लिटर्स दररोज टँकरव्दारे पुरवठा करेल.

पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता या चार गावांसाठी पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. टँकरने केलेल्या खेपांची ग्रामपंचायतीला नोंद घेण्यात यावी. नोंदवहीची तपासणी नियमितपणे गटविकास अधिकारी यांनी करावी. निवीदाधारकाने टँकर नादुरूस्त झाल्यास त्वरित दुसरे टँकर उपलब्ध करून द्यावे, असे उपविभागीय अधिकारी यांनी प्रसिद्धीपत्रकाव्दारे कळविले आहे.

# तालुक्यातील ग्रामपंचायत सरपंच पदाचे आरक्षण जाहीर

## इच्छुकांना लागले सरपंच पदाचे वेध




दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी : स्थानिक स्वराज्य संस्थेत अत्यंत महत्त्वाची संस्था असलेल्या ग्रामपंचायतीच्या आणि ग्राम स्तरावर अत्यंत प्रतिष्ठेच्या असलेल्या सरपंच पदाच्या आरक्षणाकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले होते. १६ एप्रिल रोजी तालुक्यातील ९८ ग्रामपंचायत च्या सन २०२५ ते २०३० या कार्यकाळातील सरपंच पदाचे आरक्षण जाहीर झाले आहे. सरपंच पदाचे आरक्षण जाहीर होतात काही खुशी कभ गम अशी चित्र दिसून आले असून इच्छुकांना सरपंच पदाचे वेध लागले आहे.**

मेहकर तहसील कार्यालयामध्ये १६ एप्रिल रोजी तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाचे आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. या आरक्षणामुळे इच्छुकांमध्ये हिरमोड झाला असून काही खुशी काही गमचे चित्र दिसून येत आहे. तर, सरपंच पदाचे वेध लागलेल्या इच्छुकांनी मात्र, आरक्षण जाहीर होताच आनंद व्यक्त करीत पुढील रणनीती आखण्याची प्लॅनिंग केली आहे.

### अनुसूचित जाती (s.c.) प्रवर्गासाठी आरक्षित निघालेल्या ग्रामपंचायत

सारंगपुर, बाऱ्हई, घाटनांद्रा, सोनारगव्हाण, सोनाटी, लव्हाळा,मोळा, फैजलापुर, बरठाळा, लोणी गवळी, दरवंड,आंघृड, वरदडा, पांगरखेड, गजरखेड, देउळगाव माळी, चायगाव ,वरदडी वैराळ, सावंगीवीर, लावणा,आरेगाव, कळपविहीरसाठी आरक्षीत निघाले आहे.

### नागरिकाचा मागास प्रवर्ग अर्थात (o.b.c.) साठी राखीव असलेल्या ग्रामपंचायत

वडगाव माळी,लोणी, कल्याणा, उसरण, शिवाजीनगर, उमरा, सावत्रा, कनका बु., दुधा, थार बदनापुर, विवेकानंद नगर, जवळा, माळेगाव, जनुना, खुर्द, चिंचोली बोरे, नायगाव दत्तापुर, मोहना खुर्द, पिंपळगाव उंडा, अकोला ठाकरे,बेलगाव येथील सरपंच पद हे नामाप्र अर्थात ओबीसी साठी आरक्षीत निघाले आहे.

### अनुसूचित जमातीसाठी (S.T.) आरक्षीत ग्रामपंचायत

अनुसूचित जमातीसाठी अर्थात आदिवासीसाठी सरपंचपद पदासाठी आरक्षित असलेल्या ग्रामपंचायतीमध्ये मारोतीपेठ, शहापूर, सारशिव,पारडा, मादणी, कासारखेड या ग्रामपंचायतीचा समावेश आहे.

### सर्वसाधारण पदासाठी निघालेल्या ठिकाणी होणार चुरशीची लढत

तालुक्यातील सरपंच पदाचे आरक्षण जाहीर झाले असून काही ठिकाणी अनुसूचित जाती काही ठिकाणी अनुसूचित जमाती तर काहीसाठी नागरिकाचा मागासवर्ग असे आरक्षण निघाले आहे. मात्र या आरक्षणामध्ये सर्वसाधारण प्रवर्गासाठी आरक्षित निघालेल्या ठिकाणी सरपंच पदासाठी निवडणुकी अत्यंत चुरशीची होणार आहे. अशी चर्चा सरपंच पदाचे आरक्षण जाहीर होतात राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

### सर्वसाधारण (जशिप) प्रवर्गासाठी सरपंचपद आरक्षित ग्रामपंचायत

पेनटाकळी, दादुलगव्हाण, मोळी, अंत्री देशमुख, उकळी, चोथा,परतापुर, घाटबोरी, मोहना बु., मांडवा समेत डोंगर, हिवरा साबळे, गोहोगाव, पारखेड, साम्रा, सुकळी, बाभुळखेड, नागापुर, देउळगाव साकर्शा, नायगाव देशमुख, उध्वा विठ्ठलवाडी, दुगबोरी, भोसा, कळंबेश्वर, उटी, जानेफळ, बदनापुर, भालेगाव, बम्हपुरी, शेलगाव देशमुख, कंबरखेड, वागदेव, लोणी काळे, विश्वी, अंजनी बु., डोणगाव, मिस्कीनवाडी, पिंप्री माळी, शेलगाव काकडे, गोमेधर, बोरी, गणपुर, मांडवा फॉरेस्ट, हिवरखेड, मुंदेफळ, वडाळी, खंडाळा, घुटी, वरुड, शेंदला येथील सरपंच पद हे सर्वसाधारण प्रवर्गासाठी आरक्षण निघाले आहे.